परिपत्रक क्र. 238

विषय:- कार्यालयाच्या शिस्तीच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांनी सकाळी ठीक 10.00 वाजता कार्यालयात येण्यासाठी तसेच तीन समयोत्तर उपस्थितीबाबत एक नैमित्तीक रजा कमी करण्याबाबत.

असे निदर्शनास आले आहे की, बरेचसे कर्मचारी नेमून दिलेल्या वेळेत कार्यालयात हजर होत नाहीत. दहा मिनिटे दिलेल्या "**सवलतीच्या मुदतीचा**" बरेच कर्मचारी गाडी उशिरा आली, बस उशिरा आली, डॉक्टरकडे जावे लागते, अशा किंवा अशा प्रकारच्या शुल्कक सबबी सांगून फायदा घेत असल्याचे सुध्दा आढळून आलेले आहे. यापुढे फक्त् दोन (2) वेळाच समयौततर उपस्थितीस क्षमापन दिले जाईल. तिसऱ्या समयोत्तर उपस्थितीला संबंधीत कर्मचाऱ्यांच्या नैमित्तीक रजेच्या खात्यातून, संबंधीतांना कोणत्याही प्रकारची लेखी सूचना न देता एक नैमित्तीक रजा कमी करण्यात येईल. परंतु नैसर्गिक किंवा काही अपरिहार्य कारणामुळे विस्कळीत झालेल्या वाहतुकीमुळे झालेला विलंब ग्राहय मानला जाईल.

कार्यालयाच्या शिस्तीच्या दृष्टीने सर्व कर्मचाऱ्यांनी सकाळी ठिक 10.00 वाजता कार्यालयात हजर रहावे आणि नेमून दिलेल्या कामास प्रारंभ करावा.

सर्व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी की, तिसऱ्या समयोत्तर उपस्थितीला संबंधितांच्या नैमित्तीक रजेच्या खात्यातून एक नैमित्तीक रजा कमी करण्यात येईल. तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या खाली नैमित्तीक रजा शिल्लक नसेल त्यांना "विना वेतन रजा" मंजूर करण्यात येईल व वारंवार उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आवश्यक ती कार्यालयीन कारवाई केली जाईल.

सर्व कर्मचाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

आ.द.काळे,
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

माहितीसाठी आणि योग्य कार्यवाही करिता,

सर्व विभागीय व उपविभागीय कार्यालयांना.